**नि.फौ.ख.क्र.६०९/२०२३**
शासन–वि–तानाजी.
**नि.क्र.२०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी याव्दारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,
नाव – सोनाली विठ्ठल झगडे,
वय – २५ वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी,
राहणार – यवत, ता. दौंड, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती सी. एस. भोसले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१. मी आरोपीला ओळखते व तो आज रोजी न्यायालयात हजर आहे. घटना दि.२६.०२.२०२३ रोजी रात्री १०.३० वाजता माझ्या कामाच्या ठिकाणी आरोपीने तेथे येऊन मला मारहाण केली. माझ्या डोक्याला मार लागला होता, मी बेशुध्द पडले होते, मला हॉस्पीटलला नेले होते. मी पाच दिवस हर्ष मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, केडगांव–चौफुला येथे एडमीट होते. पोलीस चौकशीकरीता मी एडमीट असतांना दवाखान्यात आले होते. आता मला फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.२१** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी व आरोपीचे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. माने हजर. आरोपीचे विद्वान विधीज्ञांनी उलटतपास घेण्यासाठी पुढील मुदत मिळण्याची तोंडी विनंती केली. त्यामुळे सा.क्र.१ च्या उलटतपासाकामी प्रकरण पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

दिनांकः– २२.१२.२०२३

**<u>साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. बी. गिरमकर यांच्यामार्फतः</u>–**

२. तानाजी शिंदे हे माझे पती आहेत. आता माझा माझ्या पतीशी काही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पतीविरुध्द तीन केसेस केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटस्फोटाची केस ऑक्टोबर–२०२३ मध्ये दोघांनी संमतीने दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटस्फोटाच्या केसनंतर कोणतीही केस झाली नाही. साक्षीदार म्हणते की, प्रस्तुतची केस ही संमतीने घटस्फोट दाखल केल्यानंतर एक महिन्याने दाखल करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटस्फोटाची संमतीने दाखल केलेल्या केसच्या आधी मारहाणीची केस दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटस्फोटाच्या ठरलेल्या शर्तीनुसार आरोपीने र.रु.१,००,०००/– चा डी.डी. दिलेला आहे. साक्षीदार म्हणते की, त्यानंतर काहीही दिलेले नाही.

३. संमतीने घटस्फोट घेण्यासाठी आमच्यामध्ये असे ठरले होते की, आरोपी मला र.रु.२,७५,०००/– आणि लग्नातील माझ्या आई–वडीलांनी व नातेवाईकांनी दिलेले सामान देईल आणि मी त्याच्या बदल्यात त्याच्याविरुध्द केलेल्या पोटगी आणि घटस्फोटाच्या केसेस काढुन घेईल असे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटस्फोटासाठी ठरलेल्या शर्ती पुर्ण झाल्या असत्या तर प्रस्तुतची केस झाली नसती. हे म्हणणे खरे नाही की, ठरल्याप्रमाणे सर्व वस्तु आता दिल्या तर आमच्यातील वाद मिटतील.

४. मला मिळेल ते काम मी करते. घटना घडली त्यावेळी मी एका ऑफीसमध्ये रिन्युवेशनचे काम करीत होते. ते ऑफीस मेडीक्लेमचे होते. ते ऑफीस संदीप थोरात यांचे होते. मला रिन्युवेशनच्या कामाचा कोणताही अनुभव अथवा पदवी नाही. माझ्या रिन्युवेशनच्या कामाचे स्वरुप कॉम्प्युटरचे सेट–अप लावणे, भिंतीच्या कलरची निगा राखणे व इतर ऑफीसची कामे करावे लागत होते. मी एकुण १६ कॉम्प्युटरचा सेट–अप लावला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पोलीसांनी नोंदविलेल्या **<u>नि.२१</u>** वरील फिर्यादीत मी बेशुध्द पडले हे वाक्य नाही. साक्षीदार म्हणते की, सदरचे वाक्य मी पोलीसांना सांगितले होते, परंतु ते पोलीसांनी नोंदवुन घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी फिर्याद नोंदवुन घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सांगितल्याचा सारांश पोलीसांनी लिहुन घेतलेला आहे, प्रत्येक शब्द तसाच लिहुन घेतलेला नाही.

५. मी आधी दुस–या ठिकाणी काम करत असताना माझी आणि संदीप थोरात यांची ओळख झाली होती. त्यामुळे मला त्यांच्या ऑफीसमधील काम मिळाले. मी नेमके किती वेळ बेशुध्द होते हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या डोक्यात मार लागल्यानंतर मी बेशुध्द पडले. मी त्यानंतर शुध्दीवर कधी आले हे मी सांगु शकत नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर मी पाच ते सहा दिवसांनी फिर्याद दिलेली आहे. साक्षीदार म्हणते की, घटनेनंतर पोलीस हॉस्पीटलमध्ये आले होते, परंतु मी बेशुध्द

असल्यामुळे फिर्याद नोंदविली नाही, नंतर शुध्दीवर आल्यानंतर पोलीस हॉस्पीटलमध्ये आले आणि त्यांनी फिर्याद नोंदविली. प्रदिप शेंडगे यांचे मेडिकल दुकान ज्या हॉस्पीटलमध्ये मी एडमीट होते तेथे आहे. आरोपीने माझ्या आणि संदीप थोरात यांच्याविरुध्द पोलीस केस केली असल्याबाबत मला माहिती नाही. मी पाच दिवस एडमीट होते. हे म्हणणे खरे आहे की, आज देखील माझे घटस्फोटाचे प्रकरण प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी ठरल्याप्रमाणे न वागल्यामुळे घटस्फोटाचे प्रकरण प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला घटस्फोट लवकर पाहिजे. हे म्हणणे खरे नाही की, घटस्फोट लवकर मिळावा म्हणुन आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणत्याही प्रकारची मारहाण आरोपीने केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

दिनांकः– ०३.०९.२०२४

<u>**फेरतपास अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**</u>

७. मला ज्या पाईपने मारहाण झाली. ती पाहिल्यास मी ओळखू शकते. आता मला दाखविण्यात आलेले आर्टीकल ए वरील पाइपचे तुकडे त्याच पाइपचे आहेत. साक्षीदाराने मुद्देमाल ओळखलेले आहे.

<u>**साक्षीदार क्र.१ यांचा फेरउलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. बी. गिरमकर यांच्यामार्फतः–**</u>

८. जप्त मुद्देमाल आर्टीकल ए हे सहजरित्या उपलब्ध असते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल हे हलक्या पध्दतीचे पाइपचे तुकडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल ए वरील पाइप जोडल्यास एक वितभर पाईप होईल. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल ए वरील पाइपने मला मारहाण झाल्याचे मी खोटे सांगत आहे.

<u>**फेरउलटतपास पुर्ण.**</u><br>
<u>**फेरफेरतपास काही नाही.**</u>

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

Sd/–

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः– ०७.०१.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.